वाचले -- १) मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि यांचा दिनांक ०४/०७/२०१६ रोजीचा विनंती अर्ज

२) इकडील पत्र क्र. मातंवि/५/कावि/१११/२०१६ दिनांक ०७/०६/२०१६

२) मा.आयुक्त यांचेकडील दिनांक ०८/०७/२०१६ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११०१८

माहिती व तंत्रज्ञान विभाग

जा.क्र.मातंवि/१३/कावि/१७५२०१६

दिनांक – ०८ /०७/२०१६

**विषय – एम गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत करण्यात येत असलेल्या Mobile Application ला मुदत वाढ देणेबाबत..**

**<u>आदेश.</u>**

शहरातील नागरिकांना विविध प्रकारचे कर मोबाईलद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध करणे व pothole सह इतर प्रकारच्या तक्रारींचे Tracking करणे बाबतची संगणक प्रणाली मोबाईल बेस Apple, Andriod, Windows & Black Berry या चार platform मध्ये विकसीत करुन त्याची अंमलबजावणी करणेसाठी मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि.यांना Mobile Application तयार करणेसाठी आदेश क्र. मा.त.वि./५/कावि/६२/२०१६ दिनांक १४/०३/२०१६ अन्वये कामकाज आदेश बजविण्यात आला आहे. सदर आदेशामध्ये कामकाजाची मुदत आदेशाच्या तारखेपासुन ४ महिने देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दिनांक १३/०७/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे. आदेशात नमुद केलेनुसार दिनांक १३/०७/२०१६ पर्यंत सदरचे काम पुर्ण होणे अपेक्षित होते.तथापि pothole व तक्रार निवारण प्रणाली इ. कामकाज वगळता घरपट्टी व पाणीपट्टी भरणाबाबतचे कामकाजामध्ये payment Gateway, software security व integration इ.कामकाजाचा समावेश असल्याने त्यास विलंब होत असल्याने सदर कामकाज पुर्ण करणेसाठी मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि यांनी दिनांक ०४/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर कामकाजास दोन महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ या आदेशान्वये मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि यांना Mobile Application तयार करणेसाठी उपरोक्त प्रमाणे नमुद केलेले कामकाज पुर्ण करणेस दिनांक १३/०७/२०१६ पासुन दोन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे. सदरची मुदत ही अंतिम असुन मुदतीत कामकाज पुर्ण न केल्यास करारनामा अटी व शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करणेत येईल याची गांभीर्यपुर्वक नोंद घेणेत यावी.

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८

प्रत – मे. प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि., पुणे